# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९९ च्या
**{मालमत्ता कर विभाग}** तरतुदी अन्वये आर्थीक वर्ष २०२५-२०२६ करीता नागपूर महानगरपालिका सिमेतील जमिनी व इमारत करीता बसवावयाचे मालमत्ता कराचे दर निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२८ (अ) अंतर्गत मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर कलम ९९ (कराचे दर निश्चित करणे) या अंतर्गत पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच ते पुढील आर्थिक वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा नागपूर महानगरपालिकेने स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेउन करावयाची आहे. नागपूर महानगरपालिकेने सभागृहाचे ठराव क्र.७० दि. ०४/०३/२०१५ अन्वये आर्थिक वर्ष २०१५-२०१६ करीता निश्चित केलेले मालमत्ता कर दर व वृक्ष कर करीता ठराव क्र.६४ दि. २०/०७/२०१७ नुसार निश्चित केलेले उक्त मालमत्ता कर दर हे वेळोवेळी स्थायी समिती व म.न.पा. सभागृहानी निर्णय घेवून आर्थिक वर्ष २०१५-२०१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ करीता सुध्दा निश्चित करण्यात आले होते.

नागपूर महानगरपालिकाद्वारा ज्या दरानी नागपूर महानगरपालिका सिमेतील इमारत व जमिनी करीता सध्यास्थितीत मालमत्ता कर आकारते व महाराष्ट्र राज्यातील इतर महानगरपालिका जसे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वसई विरार शहर महानगरपालिका, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका द्वारा ज्या दरानी इमारत व जमिनी करीता मालमत्ता कर आकारते त्या दराच्या अनुषंगाने तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. (तुलनात्मक तक्ता धारीकेच्या उजव्या बाजुस पताका क्र. 'अ' अन्वये प्रदर्शीत)

उक्त बाबी विचारात घेउन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ९९ च्या तरतुदी अन्वये स्थायी समितीनी निर्णय घेउन नागपूर महानगरपालिका सभागृहापुढे आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ करीता दर महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. सन २०२५-२०२६ हया आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दर निश्चित करण्याबाबतचा विषय बाबत निर्णय घेणेचे प्रश्न विचारात घेणे.

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2025-2026 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 1 | सामान्य कर | 1 ते 2000 | 14 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 18 टक्के |
| | | 5001 ते 20000 | 22 टक्के |
| | | 20001 ते 50000 | 26 टक्के |
| | | 50001 व त्याचे वर | 30 टक्के |
| 2 | साफसफाई किंवा मलप्रवाह कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | मलप्रवाह लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 4 | पाणी पट्टी कर | 1 ते 2000 | 10 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 12 टक्के |
| | | 5001 व त्याचे वर | 15 टक्के |
| 5 | पाणी पुरवठा लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 6 | अग्निशमन कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 7 | दिवाबत्ती कर | लागु नाही | ---- |
| 8 | रस्ते (पथ) कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 9 | म.न.पा. शिक्षण कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 10 | वृक्ष कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |

या व्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेन्ट, मंगल कार्यालये, लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील दराने वार्षीक विशेष सफाई कर आकारण्यात येत आहे.

| **अ. क्र.** | **कराचा प्रकार** | **आर्थिक वर्ष 2025-2026 करीता बसावावयाचे दर** | |
|---|---|---|---|
| | | **वार्षिक भाडे मुल्य** | **कराचा दर** |
| 11 | विशेष सफाई कर | 50000 पावेतो | 7 टक्के |
| | | 50001 व त्यापेक्षा जास्त | 10 टक्के |

## राज्य शासनाचे कर

| **अ. क्र.** | **कराचा प्रकार** | **आर्थिक वर्ष 2025-2026 करीता बसावावयाचे दर** | |
|---|---|---|---|
| | | **वार्षिक भाडे मुल्य** | **कराचा दर** |
| 12 | शिक्षण कर (निवासी) | 1 ते 150 | 2 टक्के |
| | | 151 ते 300 | 3 टक्के |
| | | 301 ते 3000 | 4 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 6 टक्के |
| 13 | शिक्षण कर (अनिवासी) | 1 ते 150 | 4 टक्के |
| | | 151 ते 300 | 6 टक्के |
| | | 301 ते 3000 | 8 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 10 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 12 टक्के |
| 14 | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | 1 ते 150 | 1 टक्का |
| | | 151 ते 300 | 1.5 टक्के |
| | | 301 ते 3000 | 2 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 2.5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 3 टक्के |
| 15 | मोठया निवासी इमारतीवरील कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | 10 टक्के |

टीप –

१) स्थायी समिती कडून प्रस्तावित शिफारस प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९९ च्या तरतूदीनूसार २० फेब्रुवारी २०२५ च्या पूर्वी म.न.पा. सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९९ (कराचे दर निश्चित करणे) नुसार पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे मालमत्ता करांतर्गत असणारे कर व ते ज्या दराने बसविण्यात येतील ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा याबाबत महानगरपालिकेने स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करणे आवश्यक आहे.

३) आर्थिक वर्ष २०२४-२०२५ करीता प्रचलित असलेले मालमत्ता कराचे दर पुढील आर्थिक वर्ष २०२५-२०२६ करीता कायम ठेवण्याचे मा. आयुक्त तथा प्रशासक यांनी निर्देशित केलेले आहेत.

४) या प्रस्तावामध्ये राज्य शासनाचे शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी इमारतीवरील करांच्या दरामध्ये सुद्धा कुठलाही बदल शासनातर्फे करण्यात आलेला नाही.

५) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

**ठराव क्रमांक** :- 134 **/मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 21/02/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त, (महसुल) विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ९९ च्या तरतुदी अन्वये आर्थीक वर्ष २०२५-२०२६ करीता नागपूर महानगरपालिका सिमेतील जमिनी व इमारत करीता बसवावयाचे मालमत्ता कराचे दर निश्चित करण्याबाबत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १२८ (अ) अंतर्गत मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर कलम ९९ (कराचे दर निश्चित करणे) या अंतर्गत पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच ते पुढील आर्थिक वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा नागपूर महानगरपालिकेने स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेउन करावयाची आहे. नागपूर महानगरपालिकेने सभागृहाचे ठराव क्र.७० दि. ०४/०३/२०१५ अन्वये आर्थिक वर्ष २०१५-२०१६ करीता निश्चित केलेले मालमत्ता कर दर व वृक्ष कर करीता ठराव क्र.६४ दि. २०/०७/२०१७ नुसार निश्चित केलेले उक्त मालमत्ता कर दर हे वेळोवेळी स्थायी समिती व म.न.पा. सभागृहानी निर्णय घेवून आर्थिक वर्ष २०१५-२०१६, २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९, २०१९-२०२०, २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५ करीता सुध्दा निश्चित करण्यात आले होते.

नागपूर महानगरपालिकाद्वारा ज्या दरानी नागपूर महानगरपालिका सिमेतील इमारत व जमिनी करीता सध्यास्थितीत मालमत्ता कर आकारते व महाराष्ट्र राज्यातील इतर महानगरपालिका जसे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वसई विरार शहर महानगरपालिका, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका द्वारा ज्या दरानी इमारत व जमिनी करीता मालमत्ता कर आकारते त्या दराच्या अनुषंगाने तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. (तुलनात्मक तक्ता धारीकेच्या उजव्या बाजुस पताका क्र. 'अ' अन्वये प्रदर्शीत)

उक्त बाबी विचारात घेउन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम ९९ च्या तरतुदी अन्वये स्थायी समितीनी निर्णय घेउन नागपूर महानगरपालिका सभागृहापुढे आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ करीता दर महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. सन २०२५-२०२६ हया आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दर निश्चित करण्याबाबतचा विषय बाबत निर्णय घेणेचे प्रश्न विचारात घेऊन.

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2025-2026 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 1 | सामान्य कर | 1 ते 2000 | 14 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 18 टक्के |
| | | 5001 ते 20000 | 22 टक्के |
| | | 20001 ते 50000 | 26 टक्के |
| | | 50001 व त्याचे वर | 30 टक्के |
| 2 | साफसफाई किंवा मलप्रवाह कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के |
| 3 | मलप्रवाह लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 4 | पाणी पट्टी कर | 1 ते 2000 | 10 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 12 टक्के |
| | | 5001 व त्याचे वर | 15 टक्के |
| 5 | पाणी पुरवठा लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 6 | अग्निशमन कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 7 | दिवाबत्ती कर | लागु नाही | ---- |
| 8 | रस्ते (पथ) कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 9 | म.न.पा. शिक्षण कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 10 | वृक्ष कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |

या व्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेन्ट, मंगल कार्यालये, लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील दराने वार्षीक विशेष सफाई कर आकारण्यात येत आहे.

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2025-2026 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 11 | विशेष सफाई कर | 50000 पावेतो | 7 टक्के |
| | | 50001 व त्यापेक्षा जास्त | 10 टक्के |

**राज्य शासनाचे कर**

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2025-2026 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 12 | शिक्षण कर (निवासी) | 1 ते 150 | 2 टक्के |
| | | 151 ते 300 | 3 टक्के |
| | | 301 ते 3000 | 4 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 6 टक्के |
| 13 | शिक्षण कर (अनिवासी) | 1 ते 150 | 4 टक्के |
| | | 151 ते 300 | 6 टक्के |
| | | 301 ते 3000 | 8 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 10 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 12 टक्के |
| 14 | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | 1 ते 150 | 1 टक्का |
| | | 151 ते 300 | 1.5 टक्के |
| | | 301 ते 3000 | 2 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 2.5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 3 टक्के |
| 15 | मोठया निवासी इमारतीवरील कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | 10 टक्के |

उपरोक्त प्रमाणे प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.